महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!
एक महिना - २४९९/- रु.
तीन महिने - ५९९९/- रु.
सहा महिने - ९९९९/- रु.
* संपादक *
मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - ११ वे ■ अंक क्र. - २७३ ■ गुरूवार दि.२२ मे २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

## ८ लाखांची खंडणी मागितली, तोतया अधिकाऱ्यांविरूध्द मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**दै. आवाज वृत्तसेवा...**

ठाणे - ठाणे येथे तीन जणांविरुद्ध नागरी अधिकारी असल्याचे भासवून आणि 'बेकायदेशीर बांधकामा'साठी कारवाईची धमकी देऊन एका बांधकाम व्यावसायिकाकडून पैसे उकळल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सांगितले.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, आरोपीने ठाणे महानगरपालिका आणि लोकायुक्त कार्यालयातील अधिकारी असल्याचे भासवले आणि त्याचा बांधकाम प्रकल्प बेकायदेशीर असल्याचा दावा केला. त्यांनी त्याच्याकडून ८ लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे, आणि इमारत पाडण्याची आणि अन्यथा त्याच्यावर कडक महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली.

दिवा येथील बिल्डरने सुरुवातीला त्यांना २०,००० रुपये दिले परंतु सोमवारी त्यांनी मुंब्रा पोलिसांशी संपर्क साधला. प्रशांत कदम, उदय बनसोडे आणि अमित पाटील यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०८(२) (खंडणी) आणि २०४ (सार्वजनिक सेवकाची बता-वणी) अंतर्गत प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला, असे अधिकाऱ्याने सांगितले.

## कैद्यांसोबत पार्टी : तीन अंमलदारांच्या बडतर्फीचे आदेश

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक - वेगवेगळ्या खुनाच्या गुन्ह्यातील संशयितांसह हॉटेलात मद्य व मटन पार्टी करणाऱ्या शहर पोलीस दलातील तिघा अंमलदारांच्या बडतर्फीचे आदेश पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी नुकतेच काढले आहेत. या घटनेने पोलीस दलात खळबळ उडाली असून, अतिशय गंभीर स्वरुपाची कसुरी केल्याचे चौकशी अहवालात निष्पन्न झाल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे. हवालदार पद्मसिंग हटेसिंग राऊळ, पोलीस शिपाई विकी रवींद्र चव्हाण व दीपक रवींद्र जठार अशी पोलीस दलातून बडतर्फ केलेल्या पोलिसांची नावे आहेत.

नाशिकरोड परिसरात सन २०२४ मध्ये दाखल एका खुनाच्या गुन्ह्यातील संशयित प्रफुल्ल विजय पाटील (२१) व उपनगर पोलीस ठाण्यात सन २०२४ मध्ये दाखल खुनाच्या गुन्ह्यातील संशयित कुंदन गाडे या दोघांना न्यायालयात सुनावणीसाठी शनिवारी हजर करण्यात आले होते. त्यांना हजर करण्यासाठी पोलीस मुख्यालयातून पद्मसिंह राऊळ, दिपक जठार, विकी चव्हाण यांच्यासह एकाला नेमण्यात आले होते. न्यायालयातून निघाल्यानंतर संशयितांपैकी एकाचे नातलग पोलिसांजवळ आले, त्यांनी संशयितांना डब्बा दिल्याचे कळते. त्यानंतर संशयितांच्या मर्जीतून हे पो-लीस छ. संभाजीनगर रोड येथील कैलासनगर भागा-तील नाशिकरोडकडे जाणाऱ्या सर्व्हिसरोडलगतच्या एका हॉटेलात गेले. तेथे मटणासह मद्यावर ताव मारत 'पार्टी' रंगविली होती. अंमलदारांनी अर्थात या कैदीपार्टीने संशयितांसह हॉटेलात 'बैठक' रंगविल्याची माहिती एका नागरिकाने थेट पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांना कळविल्यानंतर अंबडचे सहाय्यक आयुक्त शेखर देशमुख व वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड यांना पाचारण करण्यात आले. दोन्ही अधिकाऱ्यांनी छापा मारुन पो-लीस अंमलदारांसह संशयितांना ताब्यात घेतले होते.

तीन कैद्यांसाठी चार पोलीस अंमलदार नेमण्यात आले होते. त्यापैकी तिघेजण हे दोन संशयित कैद्यांसोबत उपनगर पोलिसांच्या हद्दीत एका शेताजवळील हॉटेलात 'पार्टी'साठी थांबले. त्यावेळी शिपाई दर्जाचा अंमलदार 'पार्टी'ला विरोध करून तिसऱ्या संशयित कैद्यासोबत रिक्षे-तून कारागृहापर्यंत पोहोचल्याचे कळते. संबंधित अंमलदाराविरुद्ध बडतर्फीची कारवाई झाली नाही. परंतु, गैररित्या कैद्याला कारागृहापर्यंत पोहोचविल्याने त्याच्याविरुद्ध खात्यांतर्गत इतर कारवाईची शक्यता आहे.

भारतीय संविधानातील कलम ३११(२) अन्वये, एखाद्या शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्याची त्याच्या चुकीसंदर्भात योग्य चौकशी करून त्याचे म्हणणे मांडण्याची संधी द्यायला हवी. मात्र, अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्याला त्याच्यावरील फौजदारी आरोपांमुळे बडतर्फ केले जाते, काढून टाकले जाते किंवा त्याचे पद कमी केले जाते. यासह त्याला दोषी ठरवले जाते. तेव्हा कलम ३११ (२) अंतर्गत चौकशीची आवश्यकता नाही. त्यावेळी घटक प्रमुख किंवा वरिष्ठ अधिकारी तशी लेखी नोंद करून संबंधित सनदी अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला बडतर्फ करु शकतात.

## पुणे स्टेशन परिसरात बॉम्ब असल्याचे फेक कॉल

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पुणे - शहरात एका बनावट बॉम्ब कॉलमुळे घबराट पसरली. पुणे रेल्वे स्टेशन आणि एसटी बस स्टँडजवळ बॉम्ब ठेवल्याची माहिती मिळताच, पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलिस, सरकारी रेल्वे पोलिस (जीआरपी) आणि बॉम्ब शोधक आणि निकामी करणारे पथक (बीडीडीएस) तात्काळ कारवाईत दाखल झाले.

मिळालेल्या माहितीनुसार पुणे स्टेशन, येरवडा आणि भोसरी येथे शोध मोहीम राबविण्यात आली. तसेच, सखोल शोध मोहीम राबवूनही, कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. नवी मुंबई पोलिस नियंत्रण कक्षाला बुधवारी सकाळी एक फोन आला, ज्यामध्ये पुणे रेल्वे स्टेशन, येरवडा आणि भोसरी परिसरात बॉम्ब ठेवण्यात आल्याचा उल्लेख होता. नवी मुंबई पोलिसांनी तात्काळ पुणे पोलिसांना याची माहिती दिली. यानंतर, सुरक्षा यंत्रणांनी संपूर्ण परिसरात व्यापक शोध मोहीम सुरू केली.

पुण्याचे सह पोलिस आयुक्त रंजन कुमार शर्मा म्हणाले, आम्ह-ाला सकाळी ८:३० वाजता माहिती मिळाली की काही ठिकाणी बॉम्ब ठेवण्यात आले आहे. आमच्या पथकांनी तातडीने कारवाई केली आणि शोध सुरू केला. चौकशीनंतर हा कॉल खोटा असल्याचे निष्पन्न झाले.

## सिटीबसच्या चालकाविरूध्द महिलेचा रूद्रावतार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक : शहर आणि परिसरात मंगळवारी सायंकाळी ५ नंतर वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाने हजेरी ला-वली. सोसाट्याच्या वाऱ्याने शहरातील काही भागात वृक्ष उन्मळून पडले, काही भागात रस्त्यावर पाण्याचे तळे साचले होते, शहरातील उड्डाणपूलवरुन ही पावसाचे पाणी खालील रस्त्यावर पडत असल्याने वाहनचालकांची चांगलीच तारांबळ उडाली. तर, खासगी आणि सार्वजनिक वाहतुकीवरही त्याचा परिणाम झाला. यादरम्यान, महापालिका सिटी बसचालक आणि एका महिलेचा चांगलाच वाद झाला असून या वादाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामध्ये, बस न थांबवल्याच्या रागातून महिलेकडून बस चालकाची कॉलर पकडून त्याला जाब विचारला जात आहे. त्यावर, तुम्ही मारहाण करू नका, हवं तर माझी तक्रार करा, असे बस चालक बोलताना पाहायला मिळत आहे.

नाशिक महापालिकेच्या सिटी लिंक बस चालकांवर एक महिला चांगलीच संतापल्याचं पाहायला मिळालं. बसचालक आणि वाहकासमोर महिलेचा रुद्रावतार पाहून स्थानिक प्रव-ासीही अचंबित झाले होते. नाशिकमध्ये महिलेकडून सिटी बस थांबविण्याचा प्रयत्न करूनही बस न थांबल्याने महिला संतापली होती.

मंगळवारी सायंकाळी मुसळधार पावसात महिलेकडून सिटी बस थांबवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, चालकाने बस थांबवलीच नाही. आपल्या लहान बाळासह महिला बसच्या मागे धावत गेली, तरी देखील बस निघून गेल्याने महिला जास्त संतप्त झाली होती. त्यानंतर, महिलेने निमाणी बस स्थानकापासून ते नाशिकरोड पर्यंत असा ११ किलोमीटरपर्यंत रिक्षाने बसचा पाठलाग केला. तसेच, नाशिकरोड बस स्थानकात बसचालकाला चांगलेच धारेवर धरले.

यावेळी, बस का थांबवली नाही, याचा जाब विचारत महिलेन चक्क बस चालकाची कॉलर पकडली होती. हे दृश्य पाहून स्थानिक प्रवाशांनी मध्यस्थी करत महिलेला शांत केले.

## अवकाळी पावसामुळे २७ हजार हेक्टर क्षेत्र बाधित

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक : राज्यभरात अवकाळी पावसाने (पिंपरीपरश्र रिळपी) २७ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याची माहिती कृषीमंत्री माणिकराव कोकाटे (चरपळझीरे घेझरींश) यांनी दिली आहे. अमरावती जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक १३ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झालं आहे. तर नाशिकमध्ये ५ हजार ८०० हेक्टर क्षेत्र बाधित आहे. राज्यात फळ पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे.

बोगस बी बियाणे खते देणाऱ्यावर गुन्हे दाखल करणार - राज्यात खतांचा मोठ्या प्रमाणात बफर स्टॉक असल्याची माहितीही माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. खते आणि बियाणांचं लिंकिंग कोणी करणार नाही याच्या सक्त सूचना राज्यभरातील कृषी केंद्रांना दिल्या आहेत. बोगस बी बियाणे खते देणाऱ्यावर गुन्हे दाखल केले जाणार असल्याचा इशारा देखील मामिकराव कोकाटे यांनी दिला आहे. येत्या काही दिवसात कृषी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जातील असेही ते म्हणाले.

जे अधिकारी जाणूनबुजून गैरहजर राहतील त्यांच्यावर कारवाई होणार - जे अधिकारी जाणूनबुजून गैरहजर राहणार असतील याबाबत मुख्यमंत्र्यांच्या कानावर विषय टाकणार असल्याचे माणिकराव कोकाटे म्हणाले. आधी कळवणार नसतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल असेही कोकाटे म्हणाले. शा-सनाने आश्वासन दिल्यानंतरही जर कोणी संपावर जाणार असतील तर त्यांच्यावरही कारवाई केली जाणार आहे.

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज खरीप हंगाम आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच फटकरले आहे. बैठकीला येताना अपूर्ण माहिती असणाऱ्या आणि गैरहजर असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोकाटे संतापल्याचे पाहायला मिळाले. गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश जेखील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले आहेत. त्याचबरोबर खरीप हंगामात कोणतेही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नाहीत, असा इशाराही माणिकराव कोकाटे यांनी दिला आहे. दरम्यान, खरीप हंगामात कोणताही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नसल्याच्या सूचना माणिकराव कोकाटे यांनी दिल्या आहेत. संप पुकारुन शेतकरी आणि सरकारला कोणीही वेठीस धरणार नाही, अन्यथा प्रशासकीय कारवाई केली जाईल असा इशारा कोकाटे यांनी दिला आहे. दोन दिवसांनी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे. त्यावेळेस कृषी विभाग तयार असल्याचे आश्वा-सन मी त्यांना देणार असल्याचे माणिकराव कोकाटे म्हणाले.

## नाशिक ग्रामीण जिल्ह्यात 'नो ड्रोन प्लाय झोन' घोषित

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक : पहलगाम दहशतव-ादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर मधून पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले. दोन्ही देशांकडून होणारे हल्ले थांबले असले तरी सतर्कतेच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण नाशिक ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तलय नाशिक शहर यांची हद्द वगळून) पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ नुसार १६ मे २०२५ रोजी मध्यरात्रीपासून ते ३ जून २०२५ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत नो ड्रोन प्लाय झोन आदेश जारी केला आहे.

या आदेशान्वये महत्वाचे धार्मिक स्थळ, गर्दीचे रेल्वे स्थानके, शॉपिंग मॉलस्, औद्योगिक क्षेत्र या सर्व ठिकाणी ड्रोन, रिमो नियंत्रित मायक्रोलाईट, एअर क्राफ्ट, पॅरॉग्लायडर्स, पॅरा मोटर्स, हँग ग्लायडर्स, हॉट एअर बलून आणि तत्सम सर्व हवाई क्रियाकलपांचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम २२३ व इतर लागू कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात नमूद आहे.

# नानीबाई चिखली येथे सिंदूर सन्मान तिरंगा पदयात्रा



**अनिल भोसले, चिखली (ना) नानीबाई चिखली –** भारताने 'ऑपरेशन सिंदूर ' च्या माध्यमातून पाकिस्तानला सडेतोड उत्तर देत पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला भारतीय सैनिकांच्या या शौर्याला सलाम करण्यासाठी व भारतीय सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पद यात्रा काढण्यात आली नानीबाई चिखलीकरानी उत्फुर्त प्रतिसादाने तिरंगा पदयात्रेला प्रतिसाद दिला.

हुतात्मा हरिबा बेनाडे याच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करून पदयात्रेस सुरुवात करण्यात आली.हुतात्मा हरिबा बेनाडे गल्ली,देवर्षी कॉर्नर, मेन रोड, शुक्रवार पेठ या मार्गावरून पदयात्रा सोमवार पेठ येथे आली.पदयात्रेत आजी माजी सैनिक आपल्या आर्मीचा ड्रेस घालून सहभागी झाले होते.तसेच पदयात्रेत लहान मुले,तरूण, महिला,वृद्ध तसेच विविध क्षेत्रातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक सर्व संस्थाचे पदाधिकारी, नेते,कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी सोमवार पेठ येथे पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेले पर्यटक तसेच शहीद सैनिकांना आदरांजली वाहण्यात आली.

# ऐतिहासिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येवला येथील स्वामी मुक्तानंद विद्यालयाची कु वृंदा प्रविण नागडेकर या विद्यार्थिनीने ( ९५.४० % ) टक्के गुण मिळवून दहावीत



येवला 'अ '(९५.४०%) केंद्रात प्रथम क्रमांकने उत्तीर्ण झालेल्या कुमारी वृंदा प्रवीण नागडेकर हिचेसह गुणवंत विद्यार्थी सत्कार ऐतिहासिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आला. सेनापती तात्या टोपे शिक्षण प्रसारक मंडळ व श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ या दोन्ही संस्थेचे संस्थापक अँड माधवराव नागडेकर अण्णा यांची पणती कु वृंदा हिने ९५.४० टक्के गुण मिळून मिळवून येवला तालुका 'अ' केंद्रात प्रथम आली. ऐतिहासिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष पहिलवान पाटोळे, व श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी सेक्रेटरी संजय नागडेकर यांचे हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यासह सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दत्तात्रय नागडेकर, अनिल हलवाई, सुरेश जोरी, सुभाष महाजन, रोहित महाजन,आदी उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थी यांच्या आई-वडिलांचा यावेळेस मान्यवरांनी सत्कार केला.जिद्द ठेवून परिश्रम घेतले की यश मिळतेच,जीवनात मोठे होऊन आपल्या हातून आईवडील,समाजसेवा देशसेवा आपल्या हातून घडो अशी भावना सुभाष पहिलवान यांनी आशीर्वाद देतांना व्यक्त केली.

# ओझरच्या यात्रेत बारागाडे ओढणारा मानाचा दैवी अश्व अनंतात विलीन

ओझर : प्रतिनिधी चंपाषष्ठीच्या पर्वकालावर ओझर येथे प्रतिवर्षी होणाऱ्या श्री खंडेराव महाराज यात्रोत्सवात गेल्या २७ वर्षांपासून बारा गाडे (मल्हार रथ) ओढण्याचे महत्कार्य करणारे लाडके गंगा अश्व अनंतात विलीन झाले.

जेजुरी नंतर महाराष्ट्रातील सर्वात मोठा यात्रोत्सवात ओझर येथे प्रतिवर्षी होत असतो.या यात्रोत्सवातील पहिल्याच दिवसाचे खास आकर्षण बारागाडे (मल्हाररथ) ओढण्याचे असते.प्रतिवर्षी हा दिव्य सोहळा पाहण्यासाठी लाखोंच्या संख्येने भाविक उपस्थित असतात.यात्रोत्सवात गेल्या २७ वर्षांपासून अखंडीतपने बारागाडे (मल्हार रथ) ओढण्याचे सामर्थ्यशाली कार्य करणाऱ्या मानाच्या गंगा अश्वाचे अचानक महानिर्वाण झाल्याने ओझर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.या दैवी अश्वाचे अंत्य दर्शन सर्वांना घडावे यासाठी भंडाऱ्याची मुक्त उधळण करत ओझर परिसरातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली.ओझरकर भाविकांनी देखील या दैवी अश्वाचे मनोभावे दर्शन घेत अखेरचा निरोप दिला.अंत यात्रेस ओझर परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, यात्रा कमिटी सदस्य व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ‘स्मार्टसिटी मॉडेल रोड’ मध्येच होत आहे खोड!

## स्थानिक रहिवाशांसह सुमित वाघ यांचा न.पा.ला मंगळवारपासून बेमुदत उपोषणाचा इशारा



**मोठी नववसाहत असल्याने नगरपरिषदेला सर्वाधिक कर आमच्या प्रभागातून दिला जातो. तरीही गेल्या सात ते आठ वर्षांपासून आम्हाला या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तत्कालीन नगरसेवक आणि प्रशासनाला अनेकदा तक्रारी करूनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. – यशवंत कापडणीस, स्थानिक रहिवासी**

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**तुषार रौंदळ, सटाणा (प्रतिनिधी)** – शहरातील प्रभाग क्रमांक दोन मधील सुखकर्ता अपार्टमेंट ते बालाजी नगर या मुख्य रस्त्यावर गेल्या सात ते आठ वर्षांपासून पडलेले मोठे खड्डे, रस्त्याची अत्यंत दुरवस्था, चिखलाचे साम्राज्य यामुळे स्थानिक रहिवाशी त्रस्त झाले आहेत. अनेकदा या रस्त्यावर अपघा-तही झाले आहेत. मात्र वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाने 'स्मार्टसिटी मॉडेल रोड' म्हणून घोषित केलेल्या या रस्त्याच्या कामाकडे पालिका प्रशासन सोईस्कर दुर्लक्ष करत आहे. येत्या सोमवारपर्यंत या रस्त्याचे प्रत्यक्ष काम सुरु करावे, अन्यथा मंगळवार पासून स्थानिक रहिवाशांसह नगरपरिषद प्रवेशद्वारात बेमुदत उपोषण छेडण्यात येईल, असा संतप्त इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे (शरद पवार गट) शहराध्यक्ष सुमित विजयराज वाघ यांनी दिला आहे. यासंदर्भात सुमित वाघ यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक दोन मधील रहिवाशांनी आज नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती ज्योती भगत यांची भेट घेऊन चर्चा केली आणि निवेदन दिले.

यावेळी पालिका प्रशासन या रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष करीत असल्याने श्री.वाघ व रहिवासी आक्रमक झाले होते. श्री.वाघ म्हणाले, शहरातील सर्वात जुनी नव-वसाहत असलेल्या सन्मित्र हाऊसिंग सोसायटीच्या प्रभाग क्रमांक दोन मधील सुखकर्ता अपार्टमेंट ते बालाजी नगर हा मुख्य रस्ता संपूर्ण नववसाहतीला जोडतो.

या रस्त्यावर श्री स्वामी समर्थ मंदिर, शाळा, कार्यालये यांसह मोठी नागरी वसाहत असल्याने दररोज अनेक जेष्ठ नागरिक, शाळेतील लहान मुले, भाविक पायी आणि वाहनाने ये-जा करत असतात. मात्र गेल्या सात ते आठ वर्षांपासून या रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून चिखलाच्या साम्राज्यामुळे रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे.



**सटाणा पालिकेने पाच वर्षांपूर्वी मोठा गाजावाजा करून हा रस्ता 'स्मार्टसिटी मॉडेल रोड' म्हणून घोषित केला होता. यासाठी ९९ लक्ष रूपयांचा निधी मंजूर होऊन त्याची निविदाही निघाली होती. मात्र काही राजकीय कार्यकर्त्यांच्या भांडणात निविदा निघूनही या रस्त्याचे काम रद्द झाले होते. त्यांच्यामुळे आज स्थानिक नागरिकांना यांचा त्रास सहन करावा लागतो आहे. प्रशासनाने त्वरित या रस्त्याच्या प्रत्यक्ष कामास सुरव-ात करावी, अन्यथा पालिका कार्यालयासमोर बेमुदत उपोषण छेडण्यात येईल. – सुमित विजयराज वाघ, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरद पवार गट)**

त्याचबरोबर प्रभागातील भाक्षी रस्त्यावर गेल्या वर्षभरापुर्वी छत्रपती शिवाजीनगरमधील दिलीप निकम यांच्या पानस्टॉल पासून स्वागत प्रोव्हिजनपर्यंत लाखो रुपये खर्चुन झालेले रस्त्याचे काम सुद्धा निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. त्यामुळे काम होवूनही या रस्त्यावर सर्वत्र पाणीच पाणी साचत आहे. ये-जा करणार्या पादचार्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो. खड्ड्यांमुळे अनेक ज्येष्ठ नागरिक व वाहनधारकांचे अपघातही या रस्त्यावर झाले आहेत.

या रस्त्यांची कामे पूर्ण करून रस्ता रहदारीयोग्य बनविण्यासाठी स्थानिक नागरिकांनी सातत्याने पालिका प्रशासनाकडे मागणी केली. मात्र प्रशासनाने याची कोणतीही दखल घेतलेली नाही. येत्या सोमवारपर्यंत या दोन्ही रस्त्यांचे प्रत्यक्ष काम सुरु करावे, अन्यथा मंगळवार पासून नगरपरिषद प्रवेशद्वारात बेमुदत उपोषण छेडण्याचा इशाराही श्री.वाघ यांनी यावेळी दिला.

यावेळी राजेंद्र सोनवणे, देविदास पवार, विश्वास पवार, कौतिक हिरे, रमेश सूर्यवंशी, सुरेश सूर्यवंशी, राजेंद्र सूर्यवंशी, यशवंत कापडणीस, व्यंकट पवार, प्रशांत सोनवणे, रवींद्र पगार, विलास देवरे, नंदकुमार पवार, स्वप्निल अहिरे, अशोक सोनवणे, ललित सोनवणे, ललित सूर्यवंशी, योगेश अहिरराव, ज्ञानेश्वर दंडगव्हाळ, दीपक परचुरे, संजय भामरे, संजय देवरे, किरण खैरनार, संतोष जगताप, बारकू सूर्यवंशी, दिलीप पगार, प्रकाश भामरे, मधुकर मोरे, दिलीप निकम आदींसह नागरिक उपस्थित होते.

# माणुसकी फाऊंडेशच्या वतीने सुवर्णा पगार यांचा समाजभुषण पुरस्काराने सन्मान

निफाड (प्रतिनिधी) – येथील माणुसकी फाउंडेशनच्या वतीने श्री. छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भव्य समाजभूषण पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम माजी उपमुख्यमंत्री छगनरावजी भुजबळ यांच्या हस्ते संपन्न झाला. या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

सावित्रीबाई फुले यांच्या नावाने शासनाने सुरु केलेल्या महाज्योतीच्या विभागीय समन्वयक सुवर्णा हिराबाई पोपटराव पगार यांचा समाजभूषण पुरस्काराने सन्मान संपन्न झाला या कार्यक्रमाचे आयोजन माणुसकी फाऊंडेशनचे संस्थापक सागर निकाळे यांनी केले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते शिवाजीदादा ढेपले होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मराठा विद्या प्रसारक समाजाचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, डॉ. सुजीत गुंजाळ, मधुकर शेलार, सुप्रसिद्ध कवी राजेंद्र सोमवंशी, भाऊसाहेब भवर, धारणगावचे पोलीस पाटील राहुल सोनवणे, पांडुरंग कर्डीले सर, निंबाजी निकाळे, अण्णा पाटील बोरगुडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिगंबर वडघुले. ज्ञानेश्वर सांगळे, रविंद्र आहीरे, रामभाऊ आवारे, मुकुंद आव्हाड, किरण आवारे, किशोर बस्ते यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.या प्रसंगी बोलताना छगनरावजी भुजबळ यांनी आपल्या मनोगतातून माणुसकी फाऊंडेशनच्या कार्याचे कौतुक केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९२९१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# प्रशासनाच्या चुकीमुळे ५२ शिक्षकांमध्ये अस्वस्थता

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मालेगाव (प्रतिनिधी)– १७ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद ते महानगरपालिका बदली प्रस्ताव देऊन ऑफलाइन बदली नियुक्ती प्राधिकरण अधिकारी अर्थातच मुख्य कार्यकारी अधिकारी व आयुक्त यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन सर्व अटी शर्ती पूर्ण करून पडताळून व बदली प्रस्तावाची छाननी करून रिक्त पदावर पतस्थापना दिली जाते परंतु त्यात जिल्हाअंतर्गत बदली मात्र करता येत नाही मात्र आंतरजिल्हा बदली ही दोन्हींची सहमतीने करता येते हे जरी खरे असले परंतु नाशिक महानगरपालिकेत अशा शिक्षकांना पदस्थापना दिली आहे त्यात जिल्हा अंतर्गत बदली शिक्षकांचा काही दोष नाही यात प्रशासन जबाबदार आहे व या प्रशासनाची मोठी चुक दिसून आली आहे आता पदस्थापना देऊन दोन वर्ष उलटून गेल्यानंतर संबंधित शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहे या शिक्षकांना पदस्थापना देताना जून २०२३ च्या पदनिर्धारण नुसार १०२ रिक्त पदे दिसून आली होती त्यात नाशिक महानगरपालिकेतून दरवर्षी सेवानिवृत्त स्वेच्छा निवृत्ती मयत पदोन्नती रिक्त पदावर या शिक्षकांना २०२३ पासून ते जानेवारी २५ पर्यंत ५२ पदे ही नाशिक महानगरपालिकेत भरण्यात आली व जून २०२४ मध्ये पवित्र पोर्टलने हिंदी माध्यमातून १८ पदे व उर्दू माध्यम १८ पदे भरली गेली आहेत यात मराठी माध्यमचा समावेश नव्हता ५२ शिक्षकांना पदस्थापना देताना त्यांना आता शालार्थ आयडी आणि कर्मचारी क्रमांक सेल्फी आयडी व दरमहा पगार सुरू आहे हे सगळे असताना यात तत्कालीन प्रशासनाधिकारी यांनी अंतर्गत केलेल्या बदल्या केंद्रप्रमुख भरती वार्षिक तपासणी केलेले देवाण–घेवाण कर्मचारी यांना अरेरावी भाषा अंतर्गत बदल्या मध्ये तोंडी आदेशाने व शेरे बुक यांचा वापर करून अनेक कारणे आली आहेत या कारणाने ते निलंबित झाले आहेत परंतु यात २२ जिल्हा अंतर्गत बदलेले व २६ जिल्हा बदली व ४ इतर बदल्या अनियमित दाखवून संबंधित शिक्षकांना १५ मे २०२५ रोजी त्यांच्या जिल्ह्यातत त्यांच्या मूळ शाळेवर परत जाण्याचे आदेश काढले आहे तर तेथे त्यांना ते घेऊ शकत नाही कारण त्या शाळेत आता रिक्त पद राहिलेले नाही हे कार्य मुक्त आदेश बजावत असताना त्यांनी याच कार्यालयातील कर्मचारी व चौकशी अहवाल यांच्या आधारावर सर्व शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात आले आहे हे करत असताना त्यांना नोटीस न देता कोणत्याही खुलासा न घेता त्यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे तसे पाहता जिल्हा अंतर्गत बदलीने आलेले शिक्षक १७ फेब्रुवारी २०२१ शासन निर्णय मुद्दा क्रमांक १० नुसार जिल्हा अंतर्गत बदली करता येत नाही यांच्यावर कोणतीही कारवाई न करता सर्व ५२ शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात आले आहे परंतु यात शिक्षकांचा काही दोष नाही संबंधित प्रशासनाने त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देताना सर्व अटी शर्ती प्रस्ताव पडताळून बघितला की नाही या त शिक्षकांची काही चूक नसताना त्यांना सुद्धा कार्यमुक्त करण्याचे आदेश बजावले आहे संबंधित शिक्षकांनी प्रामाणिकपणे शैक्षणिक काम केले उत्कृष्ट गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केला आहे व उत्कृष्ट शैक्षणिक कार्य महानगरपालिके शाळेत काम केले आहे शैक्षणिक क्षेत्रात पवित्र अशा ठिकाणी त्यांची 'ना घर का ना घाट का' अशी स्थिती केली आहे त्यात संचमान्यता बिंदू नियमावली व प्रशासन अधिकार्याचा निलंबन हे कारण दाखवून त्यांना मूळ शाळेचा रस्ता दाखवला आहे यात प्रशासनाची मोठी चूक असताना शिक्षकांना 'बळीचा बकरा' बनवले आहे आता या शिक्षकांचे वेतन थांबवण्याचे आदेश दिले आहेत यामुळे शिक्षकां मध्ये प्रचंड अस्वस्थता व घबराटीचे वातावरण दिसून आले आहे कुणाचे शैक्षणिक कर्ज, घर कर्ज,लहान मुलांचे शैक्षणिक प्रवेश आजारपण आई–वडिलांचे कौटुंबिक कारणे असे अनेक कारणे असून त्यांना आता पगार दिला जाणार नाही हे आपल्या महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री श्री दादाजी भोसले यांच्या जिल्ह्यात हा प्रकार होत आहे या शिक्षकांना न्याय मिळेल का यावर संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे तसेच या अन्यायग्रस्त शिक्षकांनी स्थानिक आमदार शिक्षक संघटना प्रतिनिधींना आपले कैफियत मांडलेली आहे तर आता यांना न्याय मिळतो का हे बघावे लागेल इतके मात्र नक्की प्रशासनाच्या चुकीमुळे यांच्या संसाराची राख रांगोळी झाली आहे व प्रशासन मात्र गप्प बसून आहे या अन्यायग्रस्त शिक्षकांची पुढे काय भूमिका काय असेल हे काही दिवसातच कळेल व संबंधित शिक्षकांना वाटते की आयुक्त साहेबांनी आमचे म्हणणे ऐकून घ्यायला हवे होते असे त्यांना वाटते.

## सटाणा शहरातील नवीन वसाहतीला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरवस्था; प्रशासनाचे दुर्लक्ष

**दै. आवाज वृत्तसेवा...**



सटाणा: शहरातील प्रभाग क्रमांक दोन मधील सन्मित्र हौसिंग सोसायटी, क्रांतीनगर, अभिमन्यू नगर या परिसरातील मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

नवीन वसाहतीला जोडणारा मुख्य रस्ता असल्याने या रस्त्यावर नेहमी वर्दळ असते. रस्त्याला मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने त्या ठिकाणी पाण्याचे मोठ मोठे डबके साचत आहेत त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून जाताना येताना त्रास सहन करावा लागत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या आधी या रस्त्याच्या कामाचे मोठे गाजावाजा करत उद्घाटन करण्यात आले परंतु सात आठ महिने उलटले तरी देखील अद्याप पर्यंत रस्त्याच्या कामाला सुरुवात झालेली नसल्याने स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. लवकरात लवकर रस्त्याचे काम सुरु न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा अमोल झेंड, प्रशांत कोठावदे, विनायक देवरे, गंगाधर सोनवणे, लोटन कापडणीस, हेमंत सोनवणे, सचिन आहिरे, योगेश सोनवणे व परिसरातील नागरिकांना दिला आहे.

**विद्यमान आमदार यांनी निवडणूक लागण्याच्या आधी या रस्त्याचे उदघाटन केले होते परंतु सात ते आठ महिने उलटले तरी कामाला सुरवात झाली नाही लवकरात लवकर काम सुरु न झाल्यास आंदोलन छेडू: अमोल झेंड स्थानिक राहिवासी**

**सध्या रस्त्यात खड्डा की खड्यात रस्ता की अशी अवस्था ह्या रस्त्याची झाली आहे. बागलाण विधानसभेच्या आधी मोठा गाजावाजा करत या रस्त्याचे उदघाटन करण्यात आले परंतु अद्याप पर्यत कामाला सुरवात नाही लवकरात लवकर काम सुरु करावे अन्यथा आदोलना करू: प्रशांत कोठावदे अध्यक्ष: साई सावली फाउंडेशन**

## 'ती'च्या आत्मसन्मानाची कथा सांगणाऱ्या 'वामा - लढाई सन्मानाची' चा टिझर प्रदर्शित

**दै. आवाज वृत्तसेवा...**



स्त्रीशक्तीच्या प्रखरतेचा नवा अध्याय उलगडणारा 'वामा – लढाई सन्मानाची' या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. कश्मीरा कुलकर्णी हिच्या दमदार अभिनयाने सजलेला हा टीझर स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध तिचा आक्रोश आणि सन्मानासाठीचा संघर्ष मांडतो. एका विवाहित स्त्रीचा तिच्या पतीच्या अत्याचाराविरोधातील लढा, तिच्या स्वाभिमानाची लढाई आणि त्या संघर्षातून निर्माण झालेला तिचा आत्मविश्वास हे सारं या टीझरमध्ये पाहायला मिळत आहे. या चित्रपटात स्त्रीच्या सन्मानाची, अस्तित्वाची व स्वातंत्र्याची लढाई पाहायला मिळेल. चित्रपटाच्या टीझरने प्रेक्षकांची उत्सुकता प्रचंड वाढवली आहे.

ओंकारेश्वरा प्रस्तुत आणि सुब्रमण्यम के. निर्मित या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन अशोक आर. कोंडके यांनी केले असून येत्या २३ मे रोजी 'वामा– लढाई सन्मानाची' चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. यात कश्मीरा कुलकर्णी, डॉ. महेश कुमार, गणेश दिवेकर, जुई बी त्यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

दिग्दर्शक अशोक आर. कोंडके म्हणतात, 'ही कथा केवळ महिलांची व्यथा सांगणारी नसून तिच्या आत्मविश्वासाने पुन्हा उभे राहाण्याच्या ताकदीची आहे. 'वामा – लढाई सन्मानाची' चित्रपटात हिंसाचारासोबतच भावनिक प्रवासावरही लक्ष केंद्रित केले आहे. एक सामान्य स्त्री जेव्हा अन्यायाविरोधात आवाज उठवते तेव्हा समाजात परिवर्तन घडवण्याचे बळही तिच्यात आपसूकच येते. हेच या चित्रपटात दाखवण्यात आले आहे.''

चित्रपटाचे निर्माते सुब्रमण्यम के. म्हणतात, 'महिला सशक्तीकरणावर आधारित या चित्रपटात मनोरंजन तर आहेच याशिवाय समाज परिवर्तनाचा संदेशही यातून देण्यात आला आहे. मला असे वाटते 'वामा– लढाई सन्मानाची' या चित्रपटामुळे प्रेक्षकांची मानसिकता बदलण्यास नक्कीच मदत होईल. हा चित्रपट केवळ महिलांसाठी नसून संपूर्ण समाजाला स्त्री–पुरुष समानतेचे महत्व पटवून देणारा आहे.''

### अद्दल ..

| | | |
|---|---|---|
| टिकाकरी कुणीतरी<br>महा पुरुषांचे बद्दल<br>सूर उठे जन मनात<br>चांगली घडो अद्दल | सर्वत्र माजे दलदल<br>भंग पावली शांतता<br>सगळे असे सहदल | कसा विस्कोट होतो<br>ना होई गुंत्या उकल<br>यंत्रणेचा सद्उपयोग<br>करेअधिकारीकुशल |
| भल्या चारित्र्यावरी<br>फेके शिंतोडे चिखल<br>इतिहास हरवलेला<br>विचार धारा सखल | वाटते व्याजांसहीत<br>वसूल सगळे मुद्दल<br>अटक करा आरोपी<br>उडेअचानक धांदल | प्रयास करे प्रयासाने<br>कराया मंगल कुशल |
| निचराहोई बुध्दीचा | भल्या वातावरणात<br>घडूपाहे दुषीतबदल | पाहता पहा आक्रीत<br>सर्वत्र उफाळी दंगल<br>सुंदरशा शहरगावाचे<br>बनले ज्वलंत जंगल |

**आवाज वृत्तसेवा – हेमंत मुसरीफ, पुणे. मो. ९७३०३०६९९६**

# मराठी चित्रपट प्रदर्शनाच्या अनियंत्रित जत्रेतून 'शातिर' चित्रपटाची माघार

## 'शातिर' आता १३ जून पासून तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मराठी चित्रपटसृष्टीत दरवर्षी शंभराहून अधिक चित्रपट निर्माण होतात, म्हणजे प्रत्येक आठवड्याला किमान दोन मराठी चित्रपट येणार हे निश्चित आहे. परंतु मराठी चित्रपट प्रदर्शित होण्यावर कोणत्याही संस्थेचे, चित्रपट महामंडळाचे नियंत्रण नसल्याने अनेकदा तीन – चार मराठी चित्रपट एकाच आठवड्यात येतात यामुळे कोणत्याच चित्रपटाला प्राइम टाइम मिळत नाही, २३ मे रोजी तर तब्बल सात मराठी चित्रपट प्रदर्शित होणार होते. ही मराठी चित्रपटांची अनियंत्रित स्पर्धा टाळण्यासाठी शातिर द बिगिनिंग च्या निर्मात्यानी एक पाऊल टाकले असून आता १३ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

सध्याच्या तरुणाईची कथा सांगणारा, सत्य कथेवर आधारित शातीर, द बिगिनिंग या चित्रपटाची निर्मिती श्रियांश आर्ट्स अँड मोशन पिक्चर्सच्या माध्यमातून रेश्मा वायकर यांनी केली आहे. या चित्रपटा द्वारे सुनील सुशीला दशरथ वायकर यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले आहे. सध्याच्या तरुण पिढीला पडलेला अमली पदार्थांचा विळखा, ड्रग्स माफिया आणि पोलीस यंत्रणेच्या संघर्ष, व्यसनाधीनता, गुन्हेगारी यांच्याविरुद्ध महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उभारलेला लढा या चित्रपटात प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे.



या बद्दल बोलताना दिग्दर्शक सुनील वायकर म्हणाले, शातिर The Beginning माझा दिग्दर्शक म्हणुन पाहिलाच प्रयत्न आहे. २३ मे रोजी आम्ही चित्रपट रिलीज करणार होतो मात्र ऐनवेळी काही निर्मात्यांनी याच दिवशी त्यांचे चित्रपट प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला यामुळे आम्ही पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे.

चित्रपटाच्या निर्मात्या, अभिनेत्री रेश्मा वायकर म्हणाल्या, चित्रपटाची गाणी, ट्रेलर याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. चित्रपट प्रदर्शनासाठीची आमची संपूर्ण तयारी झालेली आहे, परंतु एकाच वेळी सात मराठी चित्रपट नको म्हणून आम्ही आमचे प्रदर्शन पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

शातिर The Beginning या चित्रपटात रेश्मा वायकर या प्रमुख भूमिकेत असून योगेश सोमण, रमेश परदेशी, मीर सरोवर, रामेश्वर गीते, गौरव रोकडे, निशांत सिंग, मनोज चौधरी यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटाला रोहित नागभिडे यांचे संगीत असून वैभव देशमुख गीतकार आहेत. चित्रपटातील गीतांना वैशाली सामंत, मुग्धा कऱ्हाडे यांनी स्वरसाज चढवला आहे.



# आदिवासी भागातील आरोग्य केंद्रांसाठी चार नव्या रुग्णवाहिका उपलब्ध

## उर्वरित केंद्रांना ही लवकरच मिळणार रुग्णवाहिका - आमदार दिलीप बोरसे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा/प्रतिनिधी : बागलाण तालुक्यातील दुर्गम आदिवासीबहुल परिसरातील चार प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी नव्याने रुग्णवाहिका उपलब्ध झाल्या आहेत. यामुळे या परिसरातील रुग्णांची नेआण करणे सुलभ होणार असून गंभीर रुग्णांची विशेष सोय होणार आहे. त्यामुळे संबंधित परिसरातील जनतेला आरोग्य सेवा देणे अधिक सुलभ होणार आहे असे प्रतिपादन करून उर्वरित आरोग्य केंद्रांसाठीही लवकरच नव्याने रुग्णवाहिका उपलब्ध होणार आहेत अशी माहिती आमदार दिलीप बोरसे यांनी दिली. बागलाण तालुका विस्ताराने मोठा असून आदिवासीबहुल तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला शासकीय आरोग्य सेवेचा मोठा आधार आहे.तालुक्यात ठीकठिकाणी




प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र कार्यान्वित असून त्या त्या परिसरातील रुग्णांची स्थानिक पातळीवरच आरोग्यविषयक गरज भागते. परंतु गंभीर व अत्यावश्यक प्रसंगी रुग्णांच्या नेआणसाठी रुग्णवाहिकांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णवाहिकांशिवाय रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी तालुक्यात नव्याने रुग्णवाहिका उपलब्ध व्हाव्यात यासाठी वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न सुरू होते असेही पुढे बोलताना आमदार बोरसे यांनी सांगितले. कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व अंतर्गत एचएएलकडून रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या जातात. त्या बागलाण तालुक्यासाठी मिळाव्यात याकरिता प्रस्ताव देऊन पाठपुरावा करण्यात आला होता.त्यास यश आले असून तालुक्यातील अंबासन,मुल्हेर,अलियाबाद व केळझर या आरोग्य केंद्रांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे नवीन चार रुग्णवाहिका उपलब्ध होणार आहेत. याव्यतिरिक्त उर्वरित आरोग्य केंद्रांना रुग्णवाहिका उपलब्ध होण्यासाठी देखील पाठपुरावा सुरू तेथेही लवकरच रुग्णवाहिका उपलब्ध होतील असा विश्वास आमदार दिलीप बोरसे यांनी व्यक्त केला.

# आ. भुजबळांचा मंत्री मंडळात समावेश विंचूरला कार्यकर्त्यांचा जल्लोष

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर (प्रतिनिधी) - राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा येवला लासलगाव विधानसभा मतदार संघाचे आमदारछगन भुजबळ यांचा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात समावेश झाल्याने येथील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्राच्या सार्वत्रिक निवडणुकी नंतर स्थापन झालेल्या मंत्रिमंडळाच्या विस्तराता ना.भुजबळांना स्थान न मिळाल्याने येथील महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर होता. मात्र पुनःश्च एकदा ना.भुजबळांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्याने उत्साहीत झालेल्या महायुतीच्या कार्यकर्त्यांनी येथील प्रभू श्रीराम चौकात फटाके फोडून मिठाई वाटप करून जल्लोष साजरा केला. यावेळी विंचूर ग्रामपालिकेचे सरपंच सचिन दरेकर, भा.ज.पा. चे कैलास सोनवणे, राष्ट्रवादीचे पांडुरंग राऊत, विलास गोरे, डॉ रमेश सालगुडे, इस्माईल मोमीन, जयंत साळी, शिवाजी सुपनर, मोहसीन शेख, अशोक भट्टड, किरण नवले, रमेश ढवण, संजय शिरसाट, माधव जगताप, ओम राऊत, सुनिल नेवगे, जितेंद्र क्षीरसागर, अनिल विंचूरकर, सद्दाम शेख, गणेश राऊत, सोहम साळवे आदींसह राष्ट्रवादी कॉंग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# येवला येथील सेनापती तात्या टोपे शिक्षण मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी - येवला येथील सेनापती तात्या टोपे शिक्षण मंडळाच्या एन्झाकेम, उंदीरवाडी व धामणगाव या तीनही विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एस.एस.सी. परीक्षा मार्च २०२५ मध्ये उज्वल यश प्राप्त केल्याबद्दल सेनापती तात्या टोपे शिक्षण प्रसारक मंडळातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे सरचिटणीस,उद्योगपती सुशील गुजराथी यांच्या निवासस्थानी, संस्थेचे अध्यक्ष पंकज पारख, उपाध्यक्ष डॉ मनीष गुजराथी, सरचिटणीस सुशील गुजराथी, कोषाध्यक्ष अशोक शहा, संचालक डॉ. राजेश पटेल,कांदा व्यापारी रामेश्वर कलंत्री,शेतीतज्ञ अनिरुद्ध पटेल, संस्थेचे प्रशासनाधिकारी दत्ता महाले, विद्यालयाचे प्राचार्य दत्तकुमार उटवाळे,उपप्राचार्य कैलास धनवटे, पर्यवेक्षक अनिल शेलार, उंदीरवाडीचे मुख्याध्यापक सुभाष नागरे, धामणगावचे मुख्याध्यापक बाळासाहेब वाबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्तविकात प्राचार्य दत्तकुमार उटवाळे यांनी विद्यालयाची यशस्वी वाटचाल बाबत माहिती दिली. संचालक



डॉ. राजेश पटेल यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवून ते प्राप्त करण्यासाठी जीवापाड मेहनत घेतली पाहिजे असे सांगितले. प्रशासनाधिकारी दत्ता महाले यांनी विद्यार्थी-शिक्षक-पालक-संस्थाचालक यांच्या समन्वयातून गुणवत्ता विकास शक्य असल्याचे सांगितले. पालकांपैकी नितीन वाकचौरे, निलेश पटणी, बापू क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त करत विद्यालयाप्रति व संस्थेप्रति कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी येवला तालुक्यात प्रथम आलेली विद्यालयाची विद्यार्थीनी यशश्री वाकचौरेसह स्वरा मोरे, तितिक्षा बिन्नर, सृंजल देसले, समीक्षा महादार, दीपिका सोनवणे, निराली पटणी, साईश्रुती यादव व हर्षाली साताळकर तसेच संस्थेच्या धामणगाव विद्यालयाचे ऋषिकेश जाधव, यश चव्हाण व वैष्णवी गवळी, संस्था संचलित, न्यू इंग्लिश स्कुल, उंदीरवाडी विद्यालयाचे सृष्टी क्षीरसागर, समृद्धी काळे व कावेरी क्षीरसागर या गुणवंत विद्यार्थिनींचा संस्थेतर्फे गौरव करण्यात आला. उपस्थित सर्व पालकांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. संजय सोनवणे, मनीषा यादव, नारायण काळे, भाऊसाहेब क्षिरसागर, बापू क्षीरसागर, दिलीप गवळी, श्री.भगवडे, सौ. वसईकर, सौ. मोरे, संतोष जाधव, कैलास साताळकर इत्यादी पालक व संस्थेच्या तीनही विद्यालयाचे सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन राम पटेल, सतिश विसपुते, कैलास पाटील,अनिल शेलार यांनी केले. सूत्रसंचलन विशाल कळमकर यांनी केले तर आभार प्रेरणा जोशी यांनी मानले.कार्यक्रमास पालक, विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लासलगाव उपबाजारांच्या जागेसाठी ना.बावनकुळेंना साकडे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर(प्रतिनिधी) - भाजपा नाशिक ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांची मंत्रालयात भेट घेऊन लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निफाड, विंचूर, खाणगांव आदी उपबाजार आवारांसाठी निवेदनाद्वारे जागेची मागणी केली. निवेदनात लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती ही आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ आहे. अपुऱ्या जागेचा आवकेवर व व्यवहारांवर परिणाम होत आहे. या उपबाजार आवारांसाठी शासनाने विनामूल्य भूखंड उपलब्ध करून द्यावे.असा उल्लेख करण्यात आलेला आहे. शिष्टमंडळात अँड वाल्मिकराव गायकवाड, राजेंद्र राणा,परेश शहा, केशव सुरवाडे आदी भाजपा पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. यावेळी ना.बावनकुळे यांनी शिष्टमंडळास शासकीय भूखंड विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

# जवळगावकर परिवाराची लाडकी लेक झाली कवळे घराण्याची सून हजारोंच्या उपस्थितीत शाही विवाह संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

चंद्रशेखर वाघमारे, नांदेड - मराठवाडा विभागात लक्षवेधक ठरलेला नांदेड शहरात आजपर्यंतच्या कार्यकाळातील सर्वात मोठी लोकसंख्या उपस्थितीत असलेला शाही विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालय नांदेड येथे संपन्न झाला हा विवाह माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांची सुकन्या चिसौका नेहा व उद्योजक तथा व्हीपीके उद्योग



समूहाचे संस्थापक अध्यक्ष मारोतराव कवळे गुरुजी यांचे सुपुत्र संदीप यांचा ऋणानुबंध जुळवून मोठ्या संख्येच्या उपस्थितीत शाही विवाह सोहळा नांदेड येथे संपन्न झाला या विवाह सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मा.ना मकरंद आबा पाटील जाधव, माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार नांदेड जिल्ह्याचे लोकनेते मा ना अशोकरावजी चव्हाण, माजी महसूल मंत्री तथा कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते मा.बाळासाहेबजी थोरात, हुजूर साहिब गुरुद्वारा चे बाबा बलविंदरजी सिंघ,माजी मंत्री माधवरावजी किन्हाळकर, माजी मंत्री सूर्यकांताताई पाटील,हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, राज्यसभा खासदार अजितजी गोपछडे,नांदेड लोकसभा खासदार रवींद्र पाटील चव्हाण,माजी खासदार सुभाषजी वानखेडे, मा.आ. प्रतापरावजी पाटील चिखलीकर,भाजप मराठवाडा संघटन मंत्री संजयजी कौडगे,आमदार नारायण पाटील,आमदार बाबुरावजी कोहळीकर,आमदार आनंदरावजी बोंढारकर, आमदार भीमरावजी केराम, आमदार तुषारजी राठोड,माजी मंत्री डी.पी सावंत, माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे,माजी आमदार ओमप्रकाशजी पोकर्णा,खासदार प्रतिनिधी सौ राजश्रीताई हेमंत पाटील,आमदार प्रतिनिधी संध्याताई बालाजी कल्याणकर,आमदार प्रतिनिधी सौ वर्षाताई राजूभैया नवघरे, भाजपचे महानगराध्यक्ष अमर भाऊ राजुरकर, माजी आमदार गंगाधररावजी पटणे,माजी, माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे,आमदार हनुमंतरावजी बेटमोगरेकर, श्रीमती सुमनताई लक्ष्मणराव जाधव, मा. मिलिंद काका जाधव पाटील, मा. क्षितिज नितीन काका जाधव, पाटील,शौर्य नितीनकाका जाधव पाटील, आदवेद मिलिंदराव जाधव पाटील,सौ. प्रतिमा नितीनकाका जाधव पाटील,सौ.अर्चनाताई मकरंद आबा पाटील मिलिंदराव जाधव, मस्करभाऊ सातारकर,पाटील कवळे परिवाराचे स्नेही जावई उत्कर्ष जाधव पाटील, प्रवीण पाटील कदम लगळूदकर, प्रशांत पाटील ढोणे,राजेश पाटील कदम शेलगावकर,स्वछता दूत माधवरावजी पाटील शेळगावकर,मा संतुकरावजी हंबर्डे, चैतन्य बापू देशमुख, प्रवीण साले,विजयजी धोंडगे,पुरोषत्तम धोंडगे,अशोक पाटील मुगावकर,माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर,उपमाहापौर आनंद चव्हाण,उमरी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शिरीष देशमुख गोरठेकर,बालाजीराव बच्चेवार, श्रावण पाटील भिलवंडे,माजी शिक्षण सभापती संजयजी बेळगे, संजय देशमुख लहानकर, गोविंदरावजी नागेलीकर, किशोर स्वामी, बाळासाहेब रावणगावकर, जगदीश पाटील भोसीकर, रामचंद्रजी मुसळे, किशोर पाटील लघुळकर, शंकर पाटील लगळूदकर, माजी सभापती पूर्णा प्रकाश पाटील ढोणे, गणेशराव पाटील कारखेलीकर, दत्ताहरी पाटील चोळाखेकर, विश्वनाथ पाटील बनाळीकर,रवींद्र पोटगंतीवर, पिराजी पाटील पाटोदेकर, बालाजीराव पंडागळे,बाळू खोमणे, बाळासाहेब देशमुख बारडकर, शिवश्री कामाजीराव पवार साहेब भाऊराव कारखान्याचे माजी चेअरमन गणपतरावजी तिडके साहेब, चेअरमन नरेंद्रदादा चव्हाण,रूपामाता धाराशिव चे अनितजी गुंड,कुंटूरकर शुगर चेअरमन राजेश देशमुख कुंटूरकर,सुभाष शुगर चेअरमन सुशीलजी देशमुख, वैभव इंडस्ट्रीस लातूर चे सर्वेसर्वा शिवलिंगजी बर्गे, कॉन्ट्रॅक्टर शरदजी दाताळ,ऍड भाऊसाहेब गोरठेकर, पांडुरंग देशमुख गोरठेकर,माजी नगराध्यक्ष सुभाषजी परेवार,उमरीचे तहसीलदार थोरात साहेब, साखर प्रतिष्ठित व्यापारी निझारसेठ लालानी,इस्तक भाई, असलम सेठ,रमेश शेठ बजाज, फैसल भाई,मनोजजी लड्डा, योगेशजी उपलनचवार, सुमित खंडेलवाल अकोला, साकेतजी एमपी, विशालजी दरडा, बळरामजी बिडवई कंधार,आनंदजी बिडवई कंधार, वाघलवाडा साखर कारखान्याचे सन्माननीय संचालक व जी एम एस. जी आंबटवाड, व्हीपीके पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ , सचिव नागनाथजी पांचाळ,जी एम नामदेवराव इंगोले,गुरुजी फाउंडेशन चे सर्व संचालक,उमरी शहरातील सर्व प्रतिष्ठीत व्यापारी, समस्त सिंधी गावकरी,यांच्यासह नांदेड जिल्हा भरातील आजी माजी आमदार, सर्व पदाधिकारी,जिल्हा परिषद अध्यक्ष, सदस्य,नगराध्यक्ष,नगरसेवक जिल्ह्यातील, शासकीय अधिकारी कर्मचारी, व्यापारी,सरपंच उपसरपंच सामाजिक कार्यकर्ते शेतकरी बांधव, सर्व दूध उत्पादक, ऊस उत्पादक, पतसंस्थेचे सर्व ठेवीदार सभासद,माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते